FORM-1A N.C.R...

II...

ASSTT. COMMISSI... ANTI-CORRUP... MUM...

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154198

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि. पहिली खबर क्र. 39, वर्ष 2022, दिनांक 18/10/22
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलमे Sections 7
(ii) अधिनियम Act 1988 कलमे Sections
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार ........, तारीख पासून 09/5/22 वेळ 10:15, तारीख पर्यंत 10/5/22 वेळ 17:15 चे दरम्यान
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 09/05/2022 वेळ 10:15
Information received at P. S. Date Time

(c) गुन्हा दाखल झालेल्या सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 22/22, तारीख 18/10/22 वेळ 12:45
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ........, ठिकाणाचे नंबर ........, गल्ली ........, रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name के (पश्चिम) विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका अंधेरी मुं.
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव दिव्य डिमेलो (b) वडिलांचे / पतीचे नाव पाश्कल डिमेलो
Name Father's / Husband's Name

(c) जन्म तारीख व वय 51 वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 9819882292
Date of Birth and Age Nationality Phone No.

(e) पारपत्र क्रमांक ........, दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय नोकरी
Passport No. — Date of Issue Place of Issue Occupation

(g) धर्म Religion ख्रिश्चन, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता ........, गल्ली / सर्व्हे नं. ........ घर / नाव नं. ........ फोन / मो. नं. ........ पॅन नं. ........ वोटर्स नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
A-204 समेडान पार्क, लिंक रोड, S.K. कॉलनी समोर
रस्त्याचे नाव ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place बोरीवली (प) Post मुं. 400103 P. Stn.
तालुका ........, जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

दिपक शर्मा (दुय्यम अभियंता) के (पश्चिम) विभाग,
बृहन्मुंबई महानगर पालिका, अंधेरी मुंबई.

खालील फिर्यादी श्री दिल पास्कल डिमेलो वय 51 वर्षे,
व्यवसाय - नोकरी, रा. डी. - ए/204, अमेझॉन पार्क,
लिंक रोड, एस. के. क्लबसमोर, बोरीवली (प) मुंबई. 400103.
यांच्या स्वतंत्र पत्रावर जबाब नोंद करण्यात आला असून
त्यास नमूद गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात
येत आहे.

समक्ष

Dmello

प्रदिप देवकर
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

जबाब

दि. १८/१०/२०२२

श्री. दिल पास्कल डिमेलो, वय – ५१ वर्षे , व्यवसाय – धंदा, रा. ठी. ए/२०४, अमेझॉन पार्क, लिंक रोड, एस.के. क्लबसमोर, बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०० १०३. मो.क्र.९८१९८८२२९२, आधार कार्ड क्र. ६४८७ १४१६ ६८६८.

---

मी वरीलप्रमाणे असून उपरोक्त नमुद पत्त्यावर मागील चार वर्षापासून रहावयास आहे. मी इलेक्ट्रिकल कॉन्ट्रक्टर म्हणून विप्रो कंपनी व इतर ठिकाणी काम करत असतो.

माझी वर्सोवा, अंधेरी येथे मोकळी जागा असून नमुद जागेवर श्री. मॉरीस बोथल्लो नावाच्या एका इसमाने लोखंडी पत्रे लावून अतिक्रमण केले आहे, याबाबत दिनांक ११/०१/२०२२ रोजी मी के/पश्चिम वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी (प.) येथे लेखी तक्रार दिली होती, परंतू यावर महानगरपालिकेकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येत नव्हती, त्यामुळे नमुद तक्रारीच्या अनुषंगाने वेळोवेळी स्मरणपत्रे दिली आहेत. त्यानंतर नमुद जागेच्या वादाबाबत श्री. मॉरीस बोथल्लो याने मा.सत्र न्यायालय, दिंडोशी येथे दिवाणी स्वरूपाचा दावा दाखल केला असता मा. न्यायालयाने सदरचा दावा फेटाळून लावत अतिक्रमण काढून टाकणेबाबत आदेशित केले.

त्यानंतर एप्रिल महिन्याच्या दुस–या आठवडयात मी मा. न्यायालयाच्या आदेशाची माहिती देणेकरीता मी के/पश्चिम वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी (प.), मुंबई येथील अतिक्रमण विभागाचे अधिकारी श्री. दिपक शर्मा यांना भेटून माझे जागेवर करण्यात आलेल्या अतिक्रमणावर कारवाई करणेबाबत सांगितले त्यावेळी लोकसेवक श्री. दिपक शर्मा यांनी अतिक्रमण काढणेकरीता रितसर लेखी तक्रार केली असताना व मा. न्यायालयाने तसे आदेश दिले असताना देखील माझे वर नमुद जागेवरील अतिक्रमणावर कारवाई करण्यासाठी माझेकडे रू.२,००,०००/– इतक्या रक्कमेची मागणी केली.

माझी के/पश्चिम वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी (प.), मुंबई येथील अतिक्रमण विभागात कार्यरत असणारे अधिकारी श्री. दिपक शर्मा यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.०९/०५/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पो.नि. देवकर यांना भेटलो असता त्यांनी श्री. दिपक शर्मा, दुय्यम अभियंता,अतिक्रमण विभाग, के/पश्चिम वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी (प.), मुंबई हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत मला लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले मी माझा तक्रार अर्ज मराठी भाषेमध्ये लिहून त्यावर माझी सही केली, त्यानंतर पोनि देवकर यांनी दोन शासकीय पंचांशी व पो.नि. चव्हाण यांचेशी माझी ओळख करून दिली. पो.नि. देवकर यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. देवकर यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही शासकीय पंचांनी स्वाक्षरी केली व पो.नि. देवकर यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज त्यांचे स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि देवकर यांनी पंचांसमक्ष के/पश्चिम वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी (प.), मुंबई येथील श्री. दिपक शर्मा यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी जावून पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला आतील बाजूस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून त्यामध्ये होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पो.नि.देवकर, दोन शासकिय पंच व माझे वक्तव्य घेण्यात आले.

समक्ष

( प्रदीप देवकर )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, मुंबई

Dmello

पो.नि देवकर यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून शासकिय वाहनाने पोलीस पथकासह निघून लल्लुभाई शामलदास मार्ग, अंधेरी येथील लल्लुभाई पार्कजवळ शासकीय वाहनासह थांबलो. त्यानंतर मला पो.नि. देवकर यांनी के/पश्चिम वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी (प.), मुंबई येथील श्री. दिपक शर्मा यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतमध्ये परीधान केलेल्या बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. कारंडे यांचेसह ऑटो रिक्षाने पाठविले असता दिपक शर्मा हे मला कार्यालयात दिसले नाहीत म्हणून मी माझे मोबाईल क्र. ९८१९८८२२९२ वरून श्री.दिपक शर्मा यांचे मोबाईल फोन क्र. ९५९४१०७७४५ वर फोन केला असता त्यांनी तो उचलला व त्यांनी मला दि.१०/०५/२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. कार्यालयात येण्यास सांगितले.

त्यानंतर पो.नि देवकर यांनी दिनांक १०/०५/२०२२ रोजी पंचांसमक्ष के/पश्चिम वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी (प.), मुंबई येथील श्री. दिपक शर्मा यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पुन्हा पडताळणी करण्यात येणार असल्याचे मला सांगितले व पोनि/प्रदिप देवकर यांनी माझेशी पंचांसमक्ष चर्चा केली त्यावेळी शर्मा यांनी मला दि. १०/०५/२०२२ रोजी सकाळी १०.०० कार्यालयात भेटण्यासाठी बोलावले असल्याचे स्पष्ट झाल्याने पो.नि देवकर यांनी पंचांस, पोलीस पथकास एसीबी कार्यालयात सकाळी ०८.३० वाजता व मला परस्पर लल्लुभाई पार्क, अंधेरी पश्चिम, मुंबई येथे सकाळी ०९.३० वाजता हजर राहण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी दि. १०/०५/२०२२ रोजी लल्लुभाई पार्क, अंधेरी (प.) येथे सकाळी ९.३० वा. चे सुमारास हजर झालो, त्यावेळी पोलीस पथक व दोन्ही पंच देखील तेथे हजर होते.

त्यानंतर पो.नि देवकर यांनी सदर दिवशी पुन्हा पंचांसमक्ष के/पश्चिम वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी (प.), मुंबई येथील श्री. दिपक शर्मा यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी जावून पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला आतील बाजूस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून त्यामध्ये होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पो.नि.देवकर, दोन शासकिय पंच व माझे वक्तव्य घेण्यात आले.

त्यानंतर पो.नि. देवकर यांनी मला के/पश्चिम वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी (प.), मुंबई येथील श्री. दिपक शर्मा यांचे कार्यालयात पडताळणीकरीता पाठवण्यात येणार असल्याचे सांगून डिजीटल रेकॉर्डर चालू करून माझे शर्टाच्या आत परीधान केलेल्या बनियनला आतील बाजुस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावला व मी, पंच श्री. कारंडे यांचेसह माझे ॲक्टीवा कंपनीची दुचाकी क्र.एम.एच.४७.ए.एम.३२८९ वरून लोकसेवकाच्या कार्यालयाकडे रवाना झालो. त्यानंतर लोकसेवक शर्मा यांची भेट घेण्याकरीता त्यांचे केबिनमध्ये गेलो असता ते केबिनमध्ये हजर होते आणि त्यावेळी ते व एक महिला मोबाईलवर कॉन्फरशींग कॉलव्दारे इतर कोणाशी तरी बोलत असल्याने त्यांनी मला थोडा वेळ थांबण्यास सांगितल असता मी बाजूला जावून थांबलो. थोडयावेळाने मी लोकसेवक शर्मा यांच्याकडे गेलो, त्यावेळी पंच केबिन छोटी असल्याने केबिनच्या बाहेर थांबले. मी लोकसेवक शर्मा यांच्यासोबत माझे कामाच्या अनुषंगाने चर्चा केली त्यावेळी त्यांनी तुमच्या अतिक्रमण हटविण्याच्या कामात मदत करतो व सदरची कारवाई दि.१८/०५/२०२२ रोजी करतो असे मला सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक यांनी पूर्वी मागितलेली लाचेची रक्कम. रू. २,००,०००/– ही जास्त होत

समक्ष

( प्रदिप देवकर )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, मुंबई

असल्याचे सांगून त्यांना ती कमी करण्याबाबत सांगितले असता '' **ठिक है चलेगा कम करके.. एक ही काफी है...**'' असे सांगितले व सदरची एक लाख रूपये रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले. माझे लोकसेवक यांच्याशी बोलणे संपल्यानंतर मी बाहेर आलो त्यावेळी लोकसेवक देखील बाहेर आले व त्यावेळी लोकसेवक व तेथील उपस्थित इतरांनी माझेकडे पंचाबाबत विचारणा केली असता मी त्यांना सदरचा व्यक्ती कोण आहे? हे मला माहित नसल्याचे सांगितले त्यानंतर त्याने माझेवर संशय घेवून माझी तपासणी केली, त्यांना काहीही मिळून न आल्याने त्यांनी मला जाण्यास सांगितले व पंचास तेथेच थांबून ठेवले, त्यानंतर मी बाहेर येवून माझे मोटार स्कूटरवरून पोलीस वाहनाकडे परत आलो.

त्यानंतर पो.नि.देवकर व पो.नि. चव्हाण यांनी लोकसेवक आणि माझ्यामध्ये झालेले संभाषण पंचांसमक्ष लक्षपूर्वक ऐकले असता, लोकसेवक यांनी माझेकडे तडजोडीअंती रू. १,००,०००/— लाचेची रक्कम मागणी करून ती स्वीकारण्याचे मान्य केले व मला दिनांक १८/०५/२०२२ रोजी त्यांचे अतिक्रमणसंबंधी तक्रारीवर कार्यवाही करण्यात येईल असे सांगितल्याचे दिसून येत असलेबाबत पंचांना सांगितले, त्यानंतर मी, दोन्ही पंच व पोलीस पथक असे लाप्रवि कार्यालयात परत आलो. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

लोकसेवक शर्मा यांनी दि. १८/०५/२०२२ रोजी अतिक्रमण कारवाई करणार असल्याचे सांगितल्याने मी नमुद कामासंदर्भात दि. १३/०५/२०२२ भेट घेण्याकरीता गेलो असता त्यांची भेट झाली नाही. दि.१५/०५/२०२२ रोजी मी वर्सोवा पोलीस ठाणे येथे गेलो असता मला वर्सोवा पोलीस ठाणेतील पोलीस कर्मचारी यांनी तुमच्या मालकीच्या जागेवरील अतिक्रमण दि. ११/०५/२०२२ रोजी हटविण्यात आले असल्याचे मला सांगितले, त्यावेळी मी नमुद ठिकाणी जावून पाहिले असता माझे जागेवर लोखंडी पत्रे लावून करण्यात आलेले अतिक्रमण काढले असल्याचे मला दिसून आले. त्यानंतर मी दि. १८/०५/२०२२ रोजी के/पश्चिम वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका येथील कार्यालयात लोकसेवक श्री. दिपक शर्मा यांची भेट घेण्याकरीता गेलो असता त्यांचे कार्यालयाबाहेर असलेल्या सुरक्षारक्षकाने श्री. दिपक शर्मा यांच्या केबिनमध्ये जावून त्यांना मी भेटण्यासाठी आलेबाबत माहिती दिली व नमुद सुरक्षारक्षकाने परत येवून सांगितले की, ''तुमचे काम करण्यात आले असून भेटण्याची गरज नाही असे साहेबांनी सांगितले आहे'' असे सांगून मला आत जावू दिले नाही.

त्यानंतर नमुद श्री. मॉरीस बोथल्लो या इसमाने पुन्हा नमुद जागेवर लोखंडी पत्रे लावून अतिक्रमण केले, त्यामुळे ते हटविण्यासाठी मी वेळोवेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे पाठपुरावा करीत होतो, अतिक्रमण हटविण्यासाठी नमुद विभागाचे अधिकारी श्री. दिपक शर्मा हे मागितलेली लाचेची रक्कम स्वीकारतील असे मला वाटत होते, त्यादरम्यान मी माझे कामासंदर्भात वेळोवेळी के (पश्चिम) विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी, मुंबई येथे पाठपुरावा करीत होतो.

श्री. दिपक शर्मा, दुय्यम अभियंता, के (पश्चिम) विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी, मुंबई यांनी माझे वर्सोवा, अंधेरी येथील जागेवरील पूर्वीचे अतिक्रमण हटविले, परंतू पुन्हा केलेल्या अतिक्रमणावर कोणतीही कारवाई केली नाही तसेच त्यांनी दिनांक १०/०५/२०२२ रोजी झालेल्या पडताळणी दरम्यान माझेवर व पंचावर देखील संशय व्यक्त केला होता, त्यामूळे ते सध्या माझी भेट टाळत असल्याने यापुढे

समक्ष

( प्रदीप देवकर )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, मुंबई

Dmello

लोकसेवक शर्मा हे लाचेची रक्कम स्वीकारणार नाहीत, अशी माझी खात्री झाल्याने मी आज दि. १८/१०/२०२२ रोजी फिर्याद देण्यासाठी लाप्रवि कार्यालयात हजर झालो.

तरी, श्री. दिपक शर्मा, दुय्यम अभियंता, के (पश्चिम) विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी, मुंबई यांनी माझ्या मालकीच्या वर्सोवा, अंधेरी (पश्चिम) येथील मोकळ्या जागेवर एका इसमाने पत्राचे कंपाऊंड करून केलेले अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यासाठी माझेकडे रू.२,००,०००/— इतक्या लाचेची मागणी केली. दिनांक १०/०५/२०२२ रोजीच्या पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी अतिक्रमण हटविण्याकरीता तडजोडीअंती रू. १,००,०००/— इतक्या लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याचे मान्य केले म्हणून माझी श्री. दिपक शर्मा, अतिक्रमण विभाग, के/पश्चिम वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

श्री. दिपक शर्मा, दुय्यम अभियंता, के (पश्चिम) विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी, मुंबई यांचेशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहिली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( प्रदिप देवकर )
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

EO
IO
R.R.

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ पडताळणी
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील कॉलम क्र.07 मधील आलोसे यांनी यातील फिर्यादी यांच्या मालकीच्या जागेवरील अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्याकरीता गैरकायदा मिळकिया करीता तडजोडी अंती रु.100000/- इतक्या लाचेच्या रकमेची मागणी करुन ती स्वीकारण्याचे मान्य केले म्हणून कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
........ पो. नि. प्रदिप देवकर ........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

| | |
|---|---|
| 14. तक्रारदाराची सही व अंगठा<br>Signature and Thumb impression<br>of the Complainant / Informant. | पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.<br>Signature of Officer in-charge, Police Station<br>संपूर्ण नाव Name.... प्रदिप दत्तात्रय देवकर<br>पदनाम Rank.... पोलीस निरीक्षक, लाप्रवि मुंबई.<br>तपासिक अ. चा कोड क्र. |

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........
1. Date and time of submitted to the Court

Posting
Code No. of I. O. ........

प्रत. 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**